# Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

## (कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

**विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरणात हस्तांतरण**

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरण (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०११-१२ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १२ जून, २०२० च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.ril.com** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **http://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx** ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

नियमांमधील तरतुदींचे पालन करताना, आणि कोविड-१९ संबंधी लॉकडाऊनमुळे आईपीएफ प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या शिथिलीकरणाच्या दृष्टीकोनातून, सर्वसाधारण परिपत्रक क्र. १६/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२० नुसार, **कंपनीला संबंधित भागधारकाकडून १५ सप्टेंबर, २०२० रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.**

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यानी श्री. एस्. पी. वेणुगोपाल, जनरल मॅनेजर, **केफिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनीचे रजिस्ट्रार्स आणि ट्रान्सफर एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद - ५०० ०३२, दूरध्वनी: + ९१-४०-६७१६ १७००, फॅक्स: + ९१-४०-६७१६ १६८०, टोल फ्री क्र: १८००-४२५-८९९८ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००), ई-मेल: rilinvestor@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
के. सेथुरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२०